दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २५३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.८ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# ओमायक्रॉन जीवघेणा नाही, सौम्य लक्षणे आणि रुग्णांचे प्रमाणही कमी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**देशात या आधी आलेल्या कोरोनाच्या दोन लाटानंतर आता ओमायक्रॉनच्या रुपात तिसरी लाट येते की काय अशी भीती निर्माण झाली आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेतलं मृत्यूतांडव आपण सगळ्यांनी अनुभवलंय. त्यामुळे नुकतंच भारतात शिरकाव केलेल्या ओमायक्रॉनबद्दल नागरिकांच्या मनात भीतीसोबतच अनेक प्रश्नही आहेत. पण सगळ्या भीतीच्या छायेत ओमायक्रॉनबद्दल काहीशी दिलासादायक आणि चिंता कमी करणारी माहिती समोर येते. ओमायक्रॉन जीवघेणा नाही, त्याला घाबरुन जाऊ नका असं डॉ. अँजेलिक कोएत्झी यांनी म्हटलं आहे. दक्षिण आफ्रिकेतील ज्या डॉक्टरांनी ओमायक्रॉन या कोरोनाचा नवा व्हेरियंट शोध लावला त्या टीमपैकी डॉ. अँजेलिक कोएत्झी या एक आहेत.**

डॉ. अँजेलिक कोएत्झी म्हणाल्या की, कोरोनाचा ओमायक्रॉन हा व्हेरियंट 'डेल्टा' व्हेरियंटपेक्षा घातक नाही. 'डेल्टा' व्हेरियंटची लागण झालेल्या रुग्णांपेक्षा ओमायक्रॉन बाधितांमध्ये सौम्य लक्षणं आढळतील. लहान मुलांमध्ये ओमायक्रॉन संसर्गाचं प्रमाण हे कमी आहे. टेस्टिंग, लसीकरण आणि बूस्टर डोस तसेच लहान मुलांचं लसीकरण या गोष्टींमुळे भारतातील ओमायक्रॉनचा प्रसार रोखणं शक्य आहे.

डॉ. अँजेलिक कोएत्झी या दक्षिण आफ्रिकन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्ष आहेत. कोएत्झी यांच्या टीमनंच सर्वात आधी कोरोनाचा हा नवा व्हेरियंट शोधून काढला होता. त्या देशातल्या लसीवरील संशोधनाच्या सल्लागार समितीतही त्यांचा समावेश आहे.

सध्या जगभरात ओमायक्रॉन या कोरोनाच्या नव्या व्हेरियंटची दहशत आहे. दक्षिण आफ्रिकेतून जगातल्या अनेक देशांमध्ये याचा प्रसार झाला आहे. भारतातही काही राज्यांमध्ये ओमायक्रॉनचे रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे देशातही या नव्या व्हेरियंटबाबत सतर्कता बाळगली जात आहे.

कोरोनाचे आतापर्यंत अल्फा, बीटा, डेल्टा हे व्हेरियंट जगानं पाहिले होते. त्यात डेल्टा व्हेरियंटनं सर्वात जास्त धुमाकूळ घातला. जगभरात लसीकरण सुरु झालं आणि कोरोनाच्या या व्हेरियंट्सचा प्रभाव कमी झाला.

पण ओमायक्रॉन आला आणि पुन्हा जगासमोर एक आव्हान निर्माण झालं. शास्त्रज्ञांच्या मते, ओमायक्रॉन हा डेल्टापेक्षा जीवघेणा नाही. पण असं असलं तरी त्याचा प्रसार हा इतर व्हेरियंट्सपेक्षा वेगानं होतो. त्यामुळे कोरोनाचे नियम पाळणं, लस घेणं आणि सतर्क राहणं महत्वाचं आहे.

### नवीन पनवेलमध्ये वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या...

# १०० हुन अधिक वाहनांवर कारवाई

## पनवेल शहर वाहतूक विभागाच्या वतीने विशेष मोहीम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल येथे रेल्वे स्थानकाबाहेर नो पार्किंग, फुटपाथवर वाहने पार्किंग करणाऱ्या तसेच सम विषम पार्किंगच्या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या शंभराहून अधिक वाहनांवर पनवेल शहर वाहतूक विभागाच्यावतीने कारवाईचा बडगा उगारण्यात आला. आज (मंगळवार दि.७ डिसेंबर) सकाळपासून नवीन पनवेल येथील बिकानेर स्वीट समोरील परिसरात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात वाहतूक विभागाच्या वतीने विशेष मोहीम घेण्यात आली.



यावेळी नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या सूचनेनुसार पनवेल शहर वाहतुक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय कदम, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष म्हात्रे, पोलीस नाईक प्रवीण अहिरे, महिला पोलीस नाईक वैशाली कोकाटे, पोलीस शिपाई राठोड, महिला पोलीस शिपाई साधना पवार यांच्यासह वाहतूक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

एकीकडे वाहतूक विभाग वाहनांची कोंडी फोडण्यासाठी विविध उपाययोजना आखताना दिसत आहेत तर दुसरीकडे काही बेशिस्त वाहनचालक फुटपाथवर तसेच नो पार्किंगमध्ये वाहने पार्किंग करून पादचाऱ्यांचाच रस्ता अडवत आहेत. पनवेल परिसरातील अनेक मुख्य रस्त्यांवर बँका व कार्यालये असल्याने या ठिकाणच्या फुटपाथवर सर्रास दुचाकी व चारचाकी वाहने पार्किंग केली जातात. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक व बँकेत येणार्या जेष्ठ नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत असून पादचार्यांचा पायी चालण्याचा अधिकारच हिसकावून घेण्यात येत असल्याचे बोलले जात आहे.

फुटपाथवर तसेच दुभाजकाच्या अवतीभोवती वाहने पार्किंग केलेली असल्याने पादचार्यांना नाईलाजाने जीव मुठीत घेऊन रस्त्यावरूनच चालावे लागते. त्यामुळे अनेकदा अपघातांचे प्रसंगही ओढवतात. या अनुषंगाने पनवेल वाहतूक विभागाच्यावतीने मंगळवारी विशेष मोहीम घेण्यात आली.

यावेळी शंभराहून अधिक वाहनांवर कारवाया करण्यात आल्या असून या कारवायांमुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना चाप बसेल, असे नागरिकांमधून बोलले जात आहे.


# खारपाडा येथे ४ लाख ६८ हजारांच्या गुटखासह २१ लाख ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दै.रायगड नगरी । पेण**

मुंबई-गोवा महामार्गावरील पेण तालुक्यातील खारपाडा येथे ४ लाख ६८ हजार रुपये किमतीच्या गुटखा व वाहतूक करणाऱ्या ट्रकसह २१ लाख ९०० रुपयांचा मुद्देमाल दादर सागरी पोलीस स्टेशन कडन सोमवारी सायंकाळी ४ वाजता जप्त करण्यात आला आहे.

मुंबईहून रोहाच्या दिशेने जाणाऱ्या एम एच १४- ५५७९ क्रमांकाच्या ट्रकमध्ये कायद्याने बंदी असणारा गुटखा घेऊन जाणाऱ्या ट्रकची गुप्त माहिती दादर सागरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील यांना मिळताच त्यांनीसायंकाळी ४ वाजताच्या सुमारास सापळा रचून संबंधित ट्रक खारपाडा येथे पकडला. यावेळी चालकाला थांबवून ट्रकची सखोल तपासणी केली असता त्यात कायद्याने बंदी असणारा विमल गुटखाची १० पोती सापडून आली. यात ४ लाख ६८ हजार रुपये किमतीची ही पाकिटे असून त्या सोबत आयशर कंपनीचा ट्रक ही पकडण्यात आला आहे.

या प्रकरणी कलम ४२० / ३२८ / २७२ /२७३ अनवय्ये आरोपी विपुल विलास चिपल रा. जुन्नर पुणें यास अटक करण्यात आली असून त्यास कोर्टात हजर केले असता येत्या ११ डिसेंबर पर्यंत पाच दिवसाची पोलीस कस्टडी देण्यात आली आहे. या गुन्ह्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक के. आर.भउड, पोलीस हवालदार प्रकाश कोकरे, प्रवीण खाडे, मनीष म्हात्रे यांनी सापळा रचून सदर ट्रक व गुटखा पकडला. अधिक तपास दादर सागरी पोलीस करीत आहेत.



## संक्षिप्त...

### राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे ईडी चौकशीच्या फेऱ्यात

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाविकास आघाडी सरकारची डोकेदुखी आणखी वाढली असून सरकारच्या आणखी एक राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांची सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) चौकशी सुरू केली आहे. नगरविकास राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांची महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळ्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. आज तनपुरे यांना समन्स धाडून चौकशीसाठी बोलावण्यात आलं. त्यानंतर ते ईडीपुढे चौकशीसाठी हजर झाले. माजी गृहमंत्री अनिल देशमुख, परिवहनमंत्री अनिल परब, एकनाथ खडसे, अर्जुन खोतकर, अशा अनेक नेत्यांच्या चौकशीनंतर आता तनपुरे यांचीही चौकशी सुरू झाली आहे.

महाराष्ट्र को-ओपरेटिव्ह बँकेने ज्या कारख्यान्यांना कर्जे दिली होती त्यात अहमदनगर येथील राम गणेश गडकरी सहकारी साखर कारखान्याचाही समावेश आहे. हे कर्ज दिल्यानंतर पुढे सन २०१२ मध्ये या कारखान्याचा लिलाव करण्यात आला होता. त्यावेळी हा कारखाना प्राजक्त तनपुरे यांनी विकत घेतला. या कारखान्याची मूळ किंमत होती २६ कोटी रुपये. मात्र असे असतानाही तनपुरे यांच्या कंपनीने हा कारखाना फक्त १३ कोटी रुपयांना विकत घेतला होता. याच व्यवहारावर ईडीला संशय आहे. म्हणूनच ईडी तनपुरे यांची चौकशी करत आहे.

यापूर्वी जरंडेश्वर साखर कारखान्याच्या विक्रीवरून मोठा वाद निर्माण झाला होता. याची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा झाली होती. तो विषय चर्चेच असतानाच अर्जुन खोतकर यांच्याही कारखान्याची चौकशी सुरू करण्यात आली. त्यानंतर आता आता राज्यमंत्री तनपुरे यांच्या कारखाना चर्चेत आला आहे.

# जमीनीच्या वादातून एकाची हत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जमिनीच्या वादातून एका ५० वर्षीय इसमाची त्याच्याच नातेवाईकांनी हत्या केल्याची घटना पनवेल तालुक्यातील घोट गावाच्या हद्दीत घडली आहे.

निवृत्ती बाबू पाटील असे मृत इसमाचे नाव असून या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घोट येथील सुनंदा कोळेकर व त्यांचा मयत भाऊ निवृत्ती बाबू पाटील व त्याचा मुलगा निरंजन असे गावातील पिंपळपाडा येथील चाळीच्या मागील बाजूस बोरवेलच्या पाईपलाईनचे काम करत होते. यावेळी मोठा भाऊ बाळाराम बाबू पाटील व त्यांची दोन मुले यांनी त्याठिकाणी येऊन त्यांनी बोरवेलच्या पाईप लाईनचे काम करण्यास विरोध केला. त्यानंतर झालेल्या वादातून निवृत्ती पाटील यांच्या डोक्यावर व गळ्यावर वार करून हत्या करण्यात आली आहे. याप्रकरणी बाळाराम बाबू पाटील, नितीन बाळाराम पाटील, मनोज बाळाराम पाटील यांच्याविरोधात तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मासेमारी बोटींचा अडथळा दूर करण्यासाठी २ होल्डिंग पाँडच्या भिंती पाडून टाका ; मच्छिमारांची आग्रही मागणी

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : निसर्ग, मच्छिमार आणि शेतकरी यांना न्याय मिळावा म्हणून पर्यावरणप्रेमींनी द्रोणगिरीमधील दोन होल्डिंग पाँड पाडून पाणी येण्याजाण्याचा मार्ग मोकळा करावा अशी मागणी उरणमधिल मच्छिमार आणि पर्यावरण प्रेमींनी केली आहे. करंजा सागरी मार्गानजीक असणाऱ्या ७० स्लूज गेट्स भागातील खारफुटीला पाण्याच्या मुक्त प्रवाहाला अडथळा ठरत आहे.

पर्यावरण प्रेमी आणि मच्छिमारांच्या प्रचंड दबावानंतर पांणजे येथील होल्डिंग पाँड -१ येथील ७२ गेट्स आता खुली ठेवण्यात आली आहेत, मात्र असलेल्या भिंतींमुळे खारफुटी आणि पाणथळ क्षेत्राकडे जाणाऱ्या पाण्याचा मुक्त प्रवाह अडवला असून त्यामुळे मच्छिमारांच्या बोटींच्या वाहतूकीला अडथळा येत आहे. हनुमान कोळीवाडा ग्राम पंचायतीने अलीकडे एक ठराव मंजूर करून पाणजे, बोरी पाखाडी पाणथळ क्षेत्रातील भिंत पाडून मासेमार बोटींना होणारा अडथळा दूर करावा अशी मागणी गावचे सरपंच प्रेमानंद पाटील यांनी शासनाकडे केल्याचे सांगितले.



दरम्यान नॅटकनेक्टने सिडको नोडल ऑफिसर पर्यावरण, प्रमोद पाटील यांना संपर्क केला असता ते म्हणाले की, स्लूज गेट्समधून पाण्याचा प्रवाह येतो आणि भात शेतात अमाप पाणी साचते, अशी तक्रार काही शेतकऱ्यांनी केली आहे. सिडको ही एक नियोजन पाहणारी एजन्सी आहे. तिने शेतकऱ्यांचा उद्देश पाहता, प्रभावित क्षेत्रात बांध घालावे. मात्र होल्डिंग पाँड क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या मासेमारी बोटींच्या हालचालीला अटकाव होणार नाही याकडेही लक्ष दिले पाहिजे. असेही बी.एन.लकुमार यांनी म्हटले आहे.

पारंपरिक मच्छिमार बचाव कृती समितीचे दिलीप कोळी यांनी सांगितले.

…/२

# ३ लाख ९२ हजारांच्या दागिन्यांची बॅग खेचून अज्ञात इसम पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गाडीतून सामान बाहेर काढत असताना एका बॅगेत ठेवलेले जवळपास ३ लाख ९२ हजारांचे सोन्याचांदीचे दागिने खेचून एक इसम पसार झाल्याची घटना तळोजा परिसरात घडली आहे.

होनाराम ओगडराम चौधरी (वय-४३, रा.-कल्याण) हे त्यांच्या पत्नी व मुलीसह एका खाजगी वाहनाने खारघर येथून कल्याण येथे जात असताना तळोजा एमआयडीसी देना बँक पुढील चौकात त्यांची गाडी आली असता त्यांच्या पत्नीला उलटी सारखे होऊ लागल्याने सदर गाडी बाजूला थांबविण्यात आली.

यावेळी त्या गाडीत असलेल्या दुसऱ्या इसमाने तुम्हाला उलटी होत असेल तर येथून दुसरी रिक्षा करून जा असे त्यांनी सांगितले. यावेळी होनाराम चौधरी यांनी गाडीच्या पाठीमागील सिटखाली असलेल्या त्यांच्या चार बॅगा खाली घेतल्या. यावेळी सोन्याचांदीचे दागिने असलेली पेटी सुटकेस खाली घेत असताना गाडीच्या पाठीमागील इसमाने सदरची बॅग त्यांच्या हातातून जबरदस्तीने हिसकावून घेऊन सोन्याचांदीच्या दागिन्यांसह तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेलमध्ये ग्रामपंचायत पोटनिवडणुकीसाठी भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून पनवेल तालुक्यातील रिक्त झालेल्या जागांसाठीही निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार येत्या २१ डिसेंबरला मतदान व २२ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. यासाठी जांभिवली, खानाव आणि कसळखंड या तीन ग्रामपंचायतींमधील भाजपच्या उमेदवारांनी पक्षाचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. ६) तहसीलदार कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केले. ग्रामीण भागात भाजपची वाढलेली ताकद पाहता पक्षाला घवघवीत यश प्राप्त होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.



पनवेल तालुक्यात होणाऱ्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जांभिवली ग्रामपंचायतीमधून सुप्रिया कृणाल निकम (पवार), खानाव ग्रामपंचायतीमधून उषा रोशन फराड व पूनम प्रकाश तवले आणि कसळखंड ग्रामपंचायतीमधून कांता चंद्रकांत मते व मनीषा सचिन पाटील या भाजपच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

…/२

# विविध मागण्यांसाठी चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे आमरण उपोषण सुरू



**दै.रायगड नगरी । उरण**

चाणजे शेतकरी संघर्ष समितीने शासन दरबारी अनेक वेळा कायदेशीर, शांततेच्या मार्गाने पत्रव्यवहार करून देखील शासनाने शेतकऱ्यांच्या महत्वाच्या समस्यांकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष केले. चाणजे हद्दीतील अतिक्रमण तसेच समुद्राचे पाणी व खारफुटीचे अतिक्रमण झालेल्या शेतजमिनीची शासनाने नुकसान भरपाई द्यावी अन्यथा संबंधित जमीन संपादित करावी. साकव वर हाईट गेज पूर्ववत करणे, साकवची प्लॅप गेट कायम स्वरूपी ठेवणे. शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आदी विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी तसेच शेतकऱ्यांवर, स्थानिक भूमीपुत्रावर झालेल्या अन्यायाच्या निषेधार्थ चाणजे शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून आज दि ७/१२/२०२१ पासून सिडको कार्यालय, द्रोणागिरी येथे आमरण उपोषण सुरु करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी दिली.

सदर प्रश्न मार्गी लागण्यासाठी कायदेशीररित्या मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, प्रधान सचिव महसूल विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी

…/२

# श्रीवर्धन शहरात मोकाट घोडे व गुरे यांच्या मुक्त संचारामुळे नागरिक त्रस्त ; नगरपरिषद बघ्याच्या भूमिकेत

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन शहरात मोकाट घोडे व गुरे यांच्या मुक्त संचारामुळे नागरिक प्रचंड पणे त्रस्त झाले आहेत. अनेक नागरिकांच्या वाड्यांमध्ये किंवा शेतांमध्ये शिरून हे घोडे व मोकाट गुरे नुकसान करीत असतात. एकदा तर श्रीवर्धन बाजारपेठेमध्ये मोकाट घोडे जोरदार उधळल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात घबराट पसरली होती.

श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावरती घोडागाडी व घोड्याची राईड करणाऱ्याच्या मालकीचे हे घोडे असून सदर घोडे मालक हे श्रीवर्धन शहराच्या बाजूला असलेल्या आराठी ग्रामपंचायत हद्दीतील मेटकर्णी परिसरात राहतात तसेच काहीजण अन्य गावांमध्ये देखील राहतात. समुद्र किनाऱ्यावर दिवसभर धंदा केल्यानंतर सायंकाळी जाताना आपले घोडे मोकाट सोडून आपापल्या घरी निघून जातात. याबाबत श्रीवर्धन नगर परिषदेकडे अनेक वेळा तक्रार करून सुद्धा नगरपरिषदेकडून कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नाही. मोकाट घोडे अनेक ठिकाणी आपली विष्ठा देखील टाकत असल्याने त्या परिसरामध्ये दुर्गंधी पसरलेली असते. तसेच शहरांमधील काही नागरिक आपली गुरे देखील मोकाट सोडून देत असल्याने अनेक वेळा रस्त्यांवर किंवा बाजारपेठेमध्ये रस्त्याच्या मधोमध चारपाच गुरे बसलेली आढळून येतात.

यापूर्वी श्रीवर्धन नगर परिषदेच्या मालकीचा गुरांचा कोंडवाडा नगर परिषद कार्यालयाच्या बाजूलाच होता. मोकाट गुरे किंवा घोडे नागरिकांना शहरांमध्ये दिसल्यानंतर नागरिक सदरची जनावरे पकडून आणून ती कोंडवाड्यामध्ये ठेवत असत. त्यानंतर सदर जनावरांचा मालक आपली जनावरे घेण्यासाठी आल्यानंतर नगरपरिषद सदर नागरिकांकडून दंडाची पावती वसूल करून मगच जनावरे ताब्यात देत असत. परंतु काही वर्षांपूर्वी नगरपरिषद प्रशासनाने गुरांचा कोंडवाडा पाडून त्या ठिकाणी पर्यटक निवास बांधले. परंतु सदरचे पर्यटक निवास बांधल्यापासून त्या ठिकाणी किती वेळा पर्यटकांनी निवास केला? याची माहिती जर का घेतली तर नगरपरिषदेला त्या ठिकाणाहून शून्य उत्पन्न असल्याचेच पाहायला मिळते. तरी नगरपरिषदेने गुरांचा कोंडवाडा बांधण्यासाठी तरतुद करावी अन्यथा शहरातील मोकाट फिरणारे घोडे व गुरे यांच्या मालकांवर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी शहरातील नागरिकांमधून केली जात आहे.

# माथेरान प्रवेशद्वारावर ओमीक्रोनच्या पार्श्वभूमीवर तीन परदेशी पर्यटकांना परत पाठवले

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : माथेरान पर्यटन नगरीला कोरोना प्रादुर्भावापासून रोखण्यासाठी माथेरान पालिकेने सक्तीची पावले उचलताना येथील प्रवेशद्वारावर वैद्कीय तपासणी केंद्र सुरु केले असून ओमीक्रॉनच्या पार्श्वभूमीवर पालिकेने येणार्या सर्व पर्यटकांचे स्क्रिनिंग करण्यास सुरुवात केली असून तीन परदेशी पर्यटकांना शहरात प्रवेश न देता माघारी पाठवण्यात आले आहे.

दस्तुरी नाका येथील या स्क्रिनिंग कार्यपद्धतीमध्ये माथेरान पालिकेच्या पथकाला तीन पर्यटकांना माथेरान शहरात प्रवेश देता आला नाही. रविवारी ५ डिसेंबर रोजी माथेरानच्या दस्तुरी नाका येथे मुंबई येथून प्रवासी कारने तीन परदेशी पर्यटक आले.त्याच्याकडून पालिकेच्या आरोग्य पथकाने रायगड जिल्हाधिकारी यांच्या गाईडलाईन नुसार मागील दोन दिवसातील कोविड १९ बाबतीतील आरटीपीसीआर टेस्ट केली असल्याबाबत टेस्टचा अहवाल मागण्यात आला.मात्र २ डिसेंबरला रोजी जपानमधून मुंबई विमानतळावर पोहचलेल्या त्या तीन जपानी पर्यटकांकडे दोन दिवसांपूर्वीचा किंवा त्याआधीचा आरटीपीसीआर टेस्टचा अहवाल नव्हता.मुंबईत तीन दिवस राहून हे पर्यटक माथेरान येथे आले होते.

> कोरोनामुळे लॉकडाऊन झाल्यास माथेरान मधील सर्व व्यवहार ठप्प होत असतात व येथील नागरिक बेरोजगार होत आल्याने त्याचा मोठा फटका संपूर्ण शहराला बसला होता त्यामुळे अशी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये ह्यासाठी पालिकेने कठोर पावले उचलली आहेत.
>
> **प्रेरणा सावंत**
> **नगराध्यक्षा माथेरान**

या पर्यटकांना माथेरान पालिकेच्या आरोग्य पथकाने महाराष्ट्र शासन आणि रायगड जिल्हाधिकारी यांची ओमीक्रॉनच्या पार्श्वभूमीवर आलेली नियमावली याची माहिती करून दिली तसेच शासन आदेश देखील दाखवला.या तिन्ही जपानी पर्यटकांचे लसीकरण झाले होते आणि त्यांच्या मध्ये कोरोना संबंधी कोणत्याही प्रकारची लक्षणे दिसून येत नव्हती. तरीदेखील आरटीपीसीआर टेस्टचा अहवाल त्यांच्याकडे नसल्याने आम्ही त्या पर्यटकांना शहराची सुरक्षितता आणि नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन शहरात प्रवेश दिला नाही अशी माहिती माथेरान पालिकेच्या नगराध्यक्षा प्रेरणा सावंत आणि पालिका मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे यांनी दिली आहे.

त्याचवेळी शासनाचे नवीन आदेश येईपर्यंत माथेरान मध्ये येणार्या प्रत्येक पर्यटकांचे स्क्रिनिंग केले जाईल अशी माहिती मुख्याधिकारी भणगे यांनी दिली.माथेरानचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाका येथे अलर्ट असलेल्या माथेरान पालिकेच्या पथकामुळे माथेरान मध्ये परदेशातून आलेले तीन पर्यटक प्रवेश करू शकले नाहीत.

> माथेरान पालिकेने शक्य तेवढे सुरक्षिततेचे उपाय योजना सुरू केल्यापासून माथेरान मध्ये हा संसर्ग पसरू नये ह्यासाठी पालिका प्रशासन सज्ज आहे.
>
> **सुरेखा भणगे शिंदे**
> **मुख्याधिकारी माथेरान**

# वडवली गावदेवी क्रीडा मंडळातर्फे कबड्डी स्पर्धा

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी - श्रीवर्धन - म्हसळा असोसिएशनच्या मान्यतेने वडवली येथील गावदेवी क्रीडा मंडळ यांचा २७ वा क्रीडा महोत्सव आयोजित भव्य कबड्डी स्पर्धा ५ डिसेंबर रोजी उत्स्फूर्तपणे संपन्न झाल्या. या स्पर्धेत बोर्लीपंचतन येथील चिंचमाता संघाने प्रथम क्रमांक पटकावले.

वडवली आगरी समाज अध्यक्ष संतोष नात्ती यांच्या अध्यक्षतेखाली केऱ्या बिराडी यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा संपन्न झाला. त्यावेळी ग्रुपग्रामपंचायत वडवली सरपंच सौ. प्रियंका नात्ती, रायगड भूषण धोंडू बिराडी, उपसरपंच सुरेश धुमाळ, ग्रामपंचायत सदस्य गणेश नात्ती, दीपक कांबळे, आगरी समाज सेक्रेटरी रत्नाकर बिराडी, संतोष धुमाळ, सुदेश कांबळे, दत्ता नात्ती, श्याम धुमाळ, संतोष भायदे, विकास नात्ती, विजय चौलकर, संतोष कांबळे, निलेश नात्ती उपस्थित होते. संध्याकाळी विधानपरिषदेचे आमदार अनिकेत तटकरे यांच्या शुभहस्ते माजी खेळाडूं सुरेश गोविंद नात्ती, संदीप लक्ष्मण बिराडी, सुचिन किर, रहेमत चिविलकर यांचं सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आलं. तसेच डॉ के. व्ही. मोरे, संपदा सहदेव पेरवे, भक्ती मधुकर बिराडी, मानसी अशोक कांबळे यांचं सुद्धा विशेष सत्कार करण्यात आलं. या स्पर्धेत प्रथम क्रमांक चिंचमाता क्रीडा मंडळ बोर्ली पंचतन, द्रितीय क्रमांक जि. के. एम. वडवली, तृतीय क्रमांक ओम चिंचबादेवी बोर्लीपंचतन व चतुर्थ क्रमांक शिवसाई वडवली तसेच संपूर्ण सामन्यांमध्ये उत्कृष्ट चढाई जि. के. एम. वडवली संघाचा प्रसाद कांबळे, उत्कृष्ट पक्कड जि. के. एम. संघाचा सुशांत गाणेकर व सर्वउत्कृष्ट खेळाडू म्हणून चिंचमाता बोर्ली संघाचा रुतिक चव्हाण यांना पुरस्कार मिळाला. बक्षिस वितरण समारंभ उपस्थित मान्यवर राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष दर्शन विचारे, दिवेआगर ग्रामपंचायत सरपंच उदय बापट, मंदार तोडणकर, सिद्धेश कोसबे, संदेश किर, संतोष हरी धुमाळ, महेश कांबळे, संदीप चाळके, निलेश बा. नात्ती, प्रेमनाथ मयेकर आणि वडवली आगरी समाज बांधव यांच्या उपस्थितीत पार पडला.

**नमुना एन डी नियम ९२ (३) पहा**

**परवाना धारकाच्या उत्तर अधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटिशीचा नमुना**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की परवाना क्रमांक एम एच ४६ /६११५बी२०१६मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्रमांक एम एच ४६ एसी ५८८३ चे मालक श्री. दाऊद शेख आदम कर्जिकर यांचे तारीख ०२.०५. २०२० रोजी निधन झालेले आहे. श्री.दाऊद शेख आदम कर्जिकर पत्ता मुक्काम हाळ खुर्द पोस्ट तालुका खालापुर, जिल्हा रायगड उपरोक्त लिखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवाण्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे आणि त्यानुसार त्या परवाण्याची माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरण / प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे / प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे. या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल / प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे.

**सही /**
**उत्तराधिकारीचे नाव**
**श्री. दाऊद शेख आदम कर्जिकर**
**पत्ता : मुक्काम हाळ खुर्द पोस्ट**
**तालुका खालापुर, जिल्हा रायगड**

मा.श्री.इंदलकर साहेब
अॅड.दर्पण एस. पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.१२६१/२०२१
ने.ता.१५/०१/२०२२

श्री.भास्करन कुट्टी पंतलात
वय : ७३ वर्षे, व्यवसाय : निवृत्त
रा.७०४, आर-४, मोराज रिव्हरसाईड पार्क,
तक्का, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची पत्नी कै.सालिनी भास्करन मुकोणीळ या दि.०३/०५/२०२० रोजी मौजे : तक्का, पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेल्या असल्याने अर्जदाराने या न्यायालयात त्यांचे मृत्यूची नोंद होणेकरिता पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायालयामध्ये अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू सालीनी भास्करन मुकोणीळ हे वर नमूद तारखेस व ठिकाणी मयत झाल्या आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीशीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.०७/१२/२०२१ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते आहे की, माझे अशिल श्रीमती.स्मिता मंदार पनवेलकर हे दुकान नं.६८ (महालक्ष्मी मॉल) सतलज को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.८/८ बी, से-३५, कामोठे नवी मुंबई ४१०२०९ या दुकानाचे मालक आहेत. सदर दुकान विक्री अभिहस्तांतरण नोंदणीकृत पहिले मुळ दस्त हरविले आहे.

१) मे.महालक्ष्मी होम लॅन्ड प्रायव्हेट लिमिटेड आणि श्री.समशेरसिंग कडियान यांच्यामध्ये करण्यात आलेला दि.९/१०/२००९ रोजी सब रजिस्टार पनवेल १ डॉक्युमेंट नं.६६५५/२००९ तो दस्त दि.१०/११/२०२१ किंवा त्यापूर्वी हरविले / गहाळ झालेले त्यासंदर्भात कामोठे पोलीस स्टेशनमध्ये दि.०६/१२/२०२१ रोजी प्रॉपर्टी मिसिंग नोंदणी क्रं.१६६४/२०२१ प्रमाणे वरील कागदपत्राची नोंद केलेली आहे. सदर कागदपत्र कोणाला सापडले तर त्याचा कोणाकडून गैरवापर होवू नये. माझे अशिल असे जाहीर करतात की, जर कोणाकडून सदर कागदपत्राचा गैरवापर झाला तर नुकसान भरपाईस माझे अशिल कायदेशीर जबाबदार राहणार नाहीत. माझे अशिल असे जाहीर करतात की सदर दस्ताचे बाबतीत कोणाचे योग्य शिर्षक आणि हित किंवा दावा असेल तर त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत देण्यात यावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरले जाईल.

**सही/-**
**अॅड.संध्या लोखंडे**
**वकील उच्च न्यायालय**
**शॉप नं.४६, महालक्ष्मी मॉल, से.३५,**
**कामोठे, नवी मुंबई ४१०२०९**
**मो.७९६७९७३५९२**

# विक्रांत पाटील यांनी ऊर्जामंत्री नितीन राऊत यांचा डाव उधळून लावला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्याचे ऊर्जा मंत्री नितीन राऊत यांनी स्वतः च्या मुलाला युवक कांग्रेसचे अध्यक्ष पद मिळावे यासाठी आपल्या अखत्यारीत असलेली सरकारी यंत्रणेचा गैरवापर केला. आपल्या मुलाला युवक कॉंग्रेसचे अध्यक्षपद मिळावे यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली मिटींग घेण्यात आली यामध्ये कंत्राटदारांना व मीटर रिडींग घेणाऱ्या मुलांना शामिल करून घेण्यात आले होते.



बैठकीला जमलेल्या सर्वांना अॅप द्वारे प्रशिक्षण देण्याचे काम युवक कॉंग्रेसचे पदाधिकारी आणि महावितरण अधिकारी डी एस धनगर यांच्या देखरेखीखाली वाशी येथील गुजरात भवनात देण्याचे योजिले होते.याविषयीची माहिती मिळलताच भारतीय जनता युवा मोर्चा चे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील हे आपल्या युवा मोर्चाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे, प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रशांत कदम व अनेक कार्यकर्त्यांसह गुजरात भवन इथे पोहचले आणि या सर्व बैठकीचे चित्रण केले व महावितरण अधिकारी नोंद करीत असलेली डायरी ताब्यात घेतली.डायरी मध्ये या विषयाची इथंबूत माहिती होती.या मिटींग विषयी विचारता उपस्थित महावितरण अधिकाऱ्याने उडवाउडवीची उत्तरे दिली.

ऊर्जामंत्री नितीन राऊत यांना महाराष्ट्राच्या गोर-गरीब युवकांच्या पेक्षा आपल्या मुलाची भविष्याची काळजी महत्वाची आहे आणि शेतकरी व राज्यातील तमाम नागरिकांच्या भावनांशी काही एक देणेघेणे नाही हे यावरून स्पष्ट होते.सरकारी पैशांची उधळपट्टी चालते पण शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करता येत नाही.नागरीकांच्या व शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळणाऱ्या आणि आपल्या मंत्रिपदाचा गैरवापर करणारे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी त्वरित राजीनामा द्यावा अशी मागणी भारतीय जनता युवा मोर्चा च्या वतीने विक्रांत पाटील यांनी केली.

मे.अलोक पांडे
अॅड.विजयेंद्र नारायण मुंढे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.१२८५/२०२१
ने.ता.१५/०१/२०२२

श्री.कृतज्ञ कृष्णा पाटील
वय : २४ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.कोळखे, पो.ओएनजीसी, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वारदोली,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ — सामनेवाला

ज्याअर्थी कै.लक्ष्मीबाई गणू गायकर यांचा मृत्यू दि.०४/०५/१९९० रोजी मौजे : वारदोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. म्हणून अर्जदार यांनी या न्यायालयात सदर कै.लक्ष्मीबाई गणू गायकर यांचे मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकामी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर कै.लक्ष्मीबाई गणू गायकर हे वर नमूद ठिकाणी मयत झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असले तर या जाहीर नोटीसचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही तर, तर सदर न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.०६/१२/२०२१ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

मे.अलोक पांडे
अॅड.कल्पेश अनंता कांबळे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.१२८७/२०२१
ने.ता.१५/०१/२०२२

श्री.अनंता शिमग्या कांबळे
वय : ५८ वर्षे, व्यवसाय : निवृत्त
रा.मु.वळवली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०८ — अर्जदार
विरुद्ध
पनवेल शहर महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी कै.बाम्या बाळ्या महार ह्यांचा मृत्यू दि.२८/०५/१९६७ रोजी मौजे : वळवली, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. म्हणून अर्जदार यांनी या न्यायालयात सदर कै.बाम्या बाळ्या महार यांचे मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकामी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर कै.बाम्या बाळ्या महार हे वर नमूद ठिकाणी मयत झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असले तर या जाहीर नोटीसचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही तर, तर सदर न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.०६/१२/२०२१ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

**पृष्ठ क्र.१ वरुन...**

## मासेमारी बोटींचा अडथळा दूर करण्यासाठी २ होल्डिंग पॉंडच्या भिंती पाडून टाका

२००५-२००६ मध्ये पाणजे भिंत तसेच २०१५-१६ दरम्यान करंजा बांध उभारण्यापूर्वी आमच्या बोटी समुद्रात मुक्त संचार करत होत्या.आता आम्हाला जागा राहिली नाही आणि कोणालाही आमच्या प्रश्नांत स्वारस्य नाही. असे पारंपरिक मच्छिमार कृती समितीचे दिलीप कोळी यांनी म्हटले असून ही ते पुढे म्हणाले की, सोनारी आणि करळ-सावरखाळ गावांच्या सरपंचांनी यापूर्वीच उरण तहसिलदारांना लिहिलेल्या पत्रात सांडव तसेच भिंत आणि जेएनपीटीकडून घालण्यात आलेल्या असमान भरावाने निर्माण होणाऱ्या पूरपरिस्थितीचा मुद्दा अधोरेखित केला आहे. या गावांना हा भराव घालण्यापूर्वी पुराचा कोणताही इतिहास नसल्याचे पवार यांनी सांगितले.त्यांनी महसूल प्राधिकरणाकडून आलेला आरटीआय प्रतिसादही नमूद केला आहे.

## पनवेलमध्ये ग्रामपंचायत पोटनिवडणुकीसाठी भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल

पनवेल तहसील कार्यालयात निवडणूक अधिकारी मुकेश कांबळे, राजेंद्र दत्तात्रेय कांबळे यांच्याकडे अर्ज दाखल करण्यात आले. या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, खानाव ग्रामपंचायतीच्या सरपंच जयश्री दिसले, उपसरपंच बाळाराम पाटील, जांभिवली ग्रामपंचायतीच्या सरपंच रिया कोंडिलकर, कसळखंड ग्रामपंचायतीच्या सरपंच माधुरी पाटील, माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, उपसरपंच महेंद्र गोजे, प्रवीण ठाकूर, बूथ अध्यक्ष यशवंत पाटील यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. भारतीय जनता पक्षाने ग्रामीण भागात केलेली विकासाची कामे आणि पक्षाची वाढलेली ताकद पाहता या निवडणुकीत चांगले यश प्राप्त होईल असे दिसते.

## विविध मागण्यांसाठी चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे आमरण उपोषण सुरू

महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक कांदळवन कक्ष मुंबई, जिल्हाधिकारी रायगड, तहसीलदार उरण, भूमी व भूसंपादन अधिकारी सिडको नवी मुंबई, सहाय्यक पोलीस आयुक्त न्हावा शेवा बंदर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरण पोलीस ठाणे आदी ठिकाणी वेळोवेळी अनेकदा पत्रव्यवहार केला असूनही बाधित शेतकऱ्यांच्या, उपोषण कर्त्यांचे मागण्या मान्य होत नसल्याने आज मंगळवार दि ७/१२/२०२१ पासून बाधित शेतकऱ्यांद्वारे सिडको कार्यालय द्रोणागिरी येथे मरे पर्यंत उपोषण करण्यात येईल. व होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार राहील असा स्पष्ट इशारा चाणजे शेतकरी संघर्ष समितीने यावेळी प्रशासनाला दिला आहे.

उपोषणाचा आज दिनांक ७/१२/२०२१ रोजी उपोषणाचा पहिला दिवस आहे. मात्र अजूनही एकही शासकीय अधिकाऱ्यांनी भेट दिली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.यावेळी उपोषण स्थळी चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे,उपाध्यक्ष अरुण पाटील,सेक्रेटरी निशिकांत म्हात्रे,खजिनदार नितीन म्हात्रे,सहसेक्रेटरी परशुराम थळी,सहखजिनदार कृष्णा पाटील,व्यवस्थापक रुपेश म्हात्रे,सल्लागार ऍडव्होकेट रत्नदीप पाटील,चाणजे ग्रामपंचायत सरपंच मंगेश थळी , चांणजे ग्रामपंचायत सदस्य व्यंकटेश म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, शेतकरी श्री.नामदेव पांडुरंग भगत रा.खारघर गाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांना फाईल नं.२५, येथील खारघर नोड, प्लॉट नं.३५+३६ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झाालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्याकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल मेसर्स अशियाना बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) अब्दुल लतीफ महमुद मिया मदार २) वसीम अब्दुल सत्तार पटेल रा.हाऊस नं.६११, तळोजा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०८ यांनी त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक २५ खारघर नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | ३४ सी | ३५+३६ | ३३३.९७ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाहीत. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**अॅड.सुजाता जो. पाटील**
**विसावा, को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघार, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८८७९४१६४८३**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस जाहीर कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल नामे नेहा श्योकन्द डॉटर ऑफ बलबीर सिंह श्योकन्द लग्नानंतरचे नाव नेहा सिंह सिवाच वाईफ ऑफ अंकित सिंह सिवाच व अंकित सिंह सिवाच तर्फे कु.मु. कुलदीप सिंह सिवाच, सज्ञान, भारतीय रहिवाशी, पत्ता रा.सदनिका क्र.ए १४०१, ग्रीन हेरिटेज, प्लॉट नं.७९/८०, सेक्टर २०, खारघर नवी मुंबई ४१०२१०, यांनी खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकतीबाबत श्री.अविनीन्द्रा चंद्रा, सज्ञान, भारतीय रहिवाशी, पत्ता रा.५११, कल्याण अपार्टमेंट, सेक्टर २४, इंदिरा नगर, लखनऊ, उत्तरप्रदेश २२६०१६, यांचे बरोबर दिनांक १२/१०/२०२१ रोजी नोंदणीकृत विक्री करारनामा केलेला आहे.

तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, वारस हितसंबंध, गहाण, ताबा, दान, बक्षिस, पोटगी, विक्री, विश्वस्त, कुळ, वहिवाट, अॅटॅचमेंट इ. अगर अन्य कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात खालील प्रमाणे दिलेल्या पत्यावर समक्ष येवून भेटावे जर अशी लेखी खबर अथवा हरकत सदर मुदतीत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा हितसंबंध नाही अगर असल्यास त्याने सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुरा करतील हे सर्वांस कळावे व त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : उलवे नोड, ता.पनवेल, जि.रायगड**

| इमारतीचे नाव | सदनिका क्र. | क्षेत्रफळ | प्लॉट क्र. | सेक्टर | स्थळ |
|---|---|---|---|---|---|
| डेल्टा टॉवर को. ऑप.हौसिंग सोसायटी लि. | सदनिका क्र. ६०२ ६ वा मजला | ८४४ चौ.फूट | १ | ८ पार्ट | उलवे, ता.पनवेल, जि.रायगड |

दि.०७/१२/२०२१
ठिकाण : उलवे, नवी मुंबई

**सही/-**
**अॅड.देवेंद्र भिका पाटील**
**शॉप नं.१, श्रीजी सोहम, सी.एच. एस.लि., भूखंड क्रं.७६, सेक्टर २१, उलवे, नवी मुंबई ४१०२०६**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## गजानन दर्णे लिखित 'दोन एकर जमीन' या कथा संग्रहाचे प्रकाशन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील केगाव विभागातील जेष्ठ साहित्यिक गजानन दर्णे यांनी लिहिलेल्या दोन एकर जमीन' या कथा संग्रहाचे सोळावे प्रकाशन माजी आमदार मनोहर भोईर यांच्या हस्ते काल केगाव येथे संपन्न झाला.

या वेळी माजी आमदार मनोहर भोईर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की श्री दर्णे साहेब, वयाच्या ७२ व्या वर्षीही हे लिखाण करतात ते आमच्यासाठी खुप प्रेरणा देणारे आहे. नवीन पिढीने त्यांची पुस्तके वाचून आपल्या जीवनात चांगला आदर्श घ्यावा. वयाच्या शंभरी पर्यंत त्यांनी असेच लिखाण करत राहो व जीवनाचा आनंद घेत जावो आशा शुभेच्छा मनोहर भोईर यांनी दिल्या. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मण वीर, मोहन भोईर, संतोष पवार, धनंजय गोधळी, ए. डी. पाटील, विलास नाईक, आय. बी. सिंग व मान्यवरांसह माजी सरपंच जगजीवन नाईक ग्रामपंचायत सदस्य आशिष तांबोळी, प्रशांत दर्णे, दर्णे परिवार व ग्रामस्थ उपस्थित होते.

## पाली कर्जत एसटी सुरू; प्रवाशी सुखावले

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

राज्यभरात एसटी कर्मचारी यांचा आपल्या न्यायिक मागणीसाठी संप सुरू आहे, परिणामी ग्रामीण व शहरी भागातील नागरिक, विद्यार्थी, कामगार ,रुग्ण आदी सार्यांच्याच प्रवासाचे मुख्य साधन असलेल्या एसटी च्या संपाने जनमाणसाचे हाल व गैरसोय झाली.

महिनाभरापासून एसटीचा संप सुरू आहे. मात्र आता काही कर्मचारी कामावर रुजू होत आहेत. पालीतून कर्जत एसटी सेवा सुरू झाली आहे. आदिवासी बहुल तालुका असलेल्या सुधागडच्या गोरगरीब , कष्टकरी जनतेला खाजगी वाहनातून महागडा व वाढीव भाड्याचा प्रवास परवडत नव्हता, आता स्वस्त व सोयीस्कर असलेली एसटी सेवा सुरू झाली त्यामुळे प्रवाशी प्रचंड आनंदी झाले आहेत. सोमवारी अनेक चाकरमानी व प्रवाशांनी बसमधून प्रवास केला. व कामावर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

तालुक्यातील हभप पोंगडे महाराज व काही प्रवाशांनी चॉकलेट देऊन बसच्या चालक व वाहकांचे स्वागत केले. ही बस सकाळी ११ वाजता पालीतून कर्जतला सुटते व पुन्हा तेथून पालीला येते.

# गावाचा विकास करण्याकरीता भारतीय जनता पार्टी शिवाय पर्याय उरलेले नाही : अरुणशेठ भगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**



आपल्या गावाचा विकास करण्याकरीता भारतीय जनता पार्टी शिवाय पर्याय उरलेले नाही, असे प्रतिपादन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी मंगळवारी विकास कामांच्या शुभारंभावेळी केले. कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून मतदार संघाचा सर्वांगिण विकास होत आहे. त्यानुसार त्यांच्या आमदार निधीतून व व २५:१५ या मुलभूत विकास योजनेतून करण्यात येणार्या कामांचे भुमीपूजन व उद्घाटन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्याहस्ते हस्ते मंगळवारी झाले.

पनवेल तालुक्यात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपुर्ण पाठपुराव्यामुळे अनेक विकासाची कामे तालुक्यात सुरु आहेत. त्यांअंतर्गत ८ लाख रुपयांच्या शिवसनई ते दुर्गा देवी मंदिर पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे, १० लाख रुपयांच्या चिंचवली ते भानघर या रस्त्याच्या डांबरीकरणाचे आमदार निधीतून तसेच मुलभूत विकास येजनेच्या २० लाख निधीतून वाकडी ते दुंदरे रस्त्याच्या डांबरीकरण कामाचे भुमीपूजन तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. तसेच १६ लाख रुपयांचा आमदार निधी वापरून मोर्बे येथील एकनाथ नावडेकर यांच्या घरापासून ते मराठी शाळेपर्यत्त तयार करण्यात आलेल्या काँक्रिटच्या रस्त्याचे उद्घाटनही या वेळी अरुणशेठ भगत यांच्याहस्ते झाले. या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, भाजप-नेते एकनाथ देशेकर, पनवेल पंचायत समिती सदस्य भुपेंद्र पाटील, आनंद ढवळे, प्रकाश खैरे, नामदेव जमदाडे, शिवाजी दुर्गे, सरपंच. अनराधा विष्णू वाघमारे. उपसरपंच. मंगला गणेश उसाटकर, माजी सरपंच नरेश पाटील, रमेश पाटील, दिनेश फडके, बाळाराम उसाटकर, रामदास फडके,रमेश सिताराम पाटील. शांताराम चौधरी. किशोर पाटील. नारायण चौधरी. शत्रुघ्न उसाटकर . विठ्ठल पाटील. भीमा रामा गोसावी. बालाराम पालांडे. शंकर पवार. विष्णू चौधरी, ग्रामपंचायर सदस्य रमेश नावडेकर, एकनाथ नाईक, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# म्हसळा नगरपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी, सेना -काँग्रेस युती, शेकाप तर्फे अर्ज दाखल

**राष्ट्रवादीला लॉटरी ; प्रभाग क्रमांक ४ मधील उमेदवार बिनविरोध होण्याची शक्यता**

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा नगर पंचायतीच्या १७ प्रभागातील सार्वत्रिक निवडणूकीसाठी नाम निर्देशन पत्र दाखल करून घेण्याचे ७ डिसेंबर २०२१ रोजीच्या शेवटच्या दिवशी अर्ज दाखल करण्यात आले असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी माहिती देताना सांगितले.

उमेदवारांना उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे प्रक्रियेत विलंब होत असल्याने दुपारी ३ ऐवजी सायंकाळी ५ वाजेपर्यंतची वेळ देण्यात आली असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी शेडगे यांनी सांगितले. आज शेवटच्या दिवशी नामनिर्देशन अर्ज दाखल केलेल्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे १७ उमेदवार, काँग्रेसचे ९, शिव-सेना ७ भाजप ७, शेकाप आणि अपक्ष १ यांचा समावेश आहे. म्हसळा नगर पंचायतीमध्ये शिवसेना, काँग्रेस पक्षाची युती झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बॅरिस्टर ए.आर.अंतुले यांचे समर्थक व निष्ठावंतांचा सहकार्य घेत स्वबळावर निवडणूक लढवीत आहे. भाजप आणि शेकाप म्हसळा नगर पंचायतीमध्ये काही मोजक्याच जागेवर नशीब अजमावत आहे. बहुतांश प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेसची सरळ लढत काँग्रेस आणि सेना काँग्रेस युतीमध्ये होणार असल्याचे पक्षीय बळावरून निर्दर्शनास येत आहे.

प्रभाग क्रमांक ४ मध्ये अनुसूचित जाती जमाती महिलां करिता आरक्षित असुन या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरोज मंगेश म्हशिलकर यांचा एकमेव अर्ज सादर केला असल्याने त्यांची बिनविरोध निवड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राष्ट्रवादी



काँग्रेसचे या जागी बिनविरोध निवड होऊन म्हसळा नजर पंचायत निवडणुकीत कायम सत्तेत राहण्याचे मनसुबे वाढले आहेत. प्रभाग क्रमांक १ ते ४ अर्ज वगळता अन्य सर्व प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेस विरोधात शिवसेना- काँग्रेस युती मध्ये सरळ लढत होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सर्वच राजकीय पक्षांचे उमेदवार व त्यांचे कार्यकर्त्यांची नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी लगबग सुरू होती. उमेदवारी अर्ज भरण्याची किचकट प्रक्रिया असल्याने तसेच ऑनलाईन व ऑफलाईन पद्धती असल्याने उमेदवारी अर्ज भरण्यास विलंब झाले असल्याचे सांगितले जाते. म्हसळा नगर पंचायत निवडणूक लढविण्यासाठी आज अखेरीस ४३ अर्ज दाखल झाले आहेत. निवडणूक प्रकिया शांत आणि सुव्यवस्थेत संपन्न होण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी अमित शेडगे, सहा. नि. नि.अधिकारी मनोज उकिर्डे, तहसीलदार समीर घारे आणि पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे यांनी कामकाज चोखपणे पार पाडले.

# शिवसेना पेण तालुका अध्यक्षपदी तुषार मानकवले

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील आंबेगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य तुषार मानकावले यांची शिवसेना भवनातून रायगड जिल्हा प्रमुख, आमदार महेंद्र दळवी यांच्या शिफारशी नुसार पेण तालुका शिवसेना प्रमुख पदी नेमणूक करण्यात आली आहे.

तुषार मानकावले यांनी अतिशय कमी वेळात पेण तालुक्यात शिवसेना रुजवण्याचा मोलाचा कार्य केल्यामुळे तसेच पेण पूर्व विभाग म्हणजे शेकापक्षाच्या बालेकिल्ल्यात आंबेगाव ग्रामपंचायतीमध्ये पहिल्यांदाच शिवसेनेची एक हाती सत्ता आली. ही सत्ता आणल्यामुळे पेण पूर्व विभागात शिवसेनेची घोडदौड सुरू झाली आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठी ने योग्य व्यक्तीची योग्य वेळी निवड केली आहे. तुषार मानकावले हा तळागाळातील कट्टर शिवसैनिक असून अतिशय कठीण परिस्थितीत पेण पूर्व विभागात शिवसेना रुजवण्याचं काम केलं आहे. त्याच्या या कामाची पोच पावती म्हणून त्याची शिवसेना पेण तालुका प्रमुख म्हणून नेमणूक झाली असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'देवदूत' कल्पेश ठाकूर यांच्या कार्यअहवालाचे बुधवारी प्रकाशन

**दै.रायगड नगरी । पेण**

मुंबई - गोवा महामार्गावरील अपघात ग्रस्तांना मागील सतरा वर्षांपासून मदत करणाऱ्या तसेच मागील दोन वर्षे कोरोना काळात मोफत रुग्णवाहिका सेवा तसेच मोफत अन्नदान करणारे 'देवदूत' कल्पेश ठाकूर यांच्या कार्यअहवालाचे प्रकाशन पेण विधानसभा मतदार संघाचे आमदार रविशेठ पाटील व अलिबाग विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी, उपविभागीय पोलीस अधीक्षक विभा चव्हाण, माजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक आय. एस.पाटील यांच्या हस्ते बुधवार ( दि.८) डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता होत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील पेण तालुक्यातील आंबिवली फाटा नजीक असलेल्या हॉटेल साई सहारा येथे होत असलेल्या या प्रकाशन सोहळ्यासाठी रायगड जिल्ह्याचे वाहतूक पोलीस निरीक्षक अरुण भोर, पेण पोलीस ठाण्याचे निरीक्षक देवेंद्र पोळ, वडखळ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, दादर सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील, अभियंता सरचिटणीस संजय ठाकूर आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असल्याचे साई सहारा प्रतिष्ठान पेण तर्फे सांगण्यात आले.


मे.चौथे न्यायालय (भाकरे साो)

अर्जदाराचे वकील : ॲड.संतोष एन. गायकवाड

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१३०२/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०२/०२/२०२२

१) श्री.लक्ष्मण चांगा चिखलेकर
वय : ६६ वर्षे, व्यवसाय :
रा.टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड, पिन कोड ४१०२१८
२) श्री.राम चांगा चिखलेकर
वय : ६३ वर्षे, व्यवसाय :
रा.रुम नं.५०५, काळुंद्रे, पो.ओएनजीसी,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
३) श्री.संभाजी चांगा चिखलेकर
वय : ५७ वर्षे, व्यवसाय :
रा.काळुंद्रे, पो.ओएनजीसी कॉलनी,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
४) श्री.पांडुरंग चांगा चिखलेकर
वय : ४५ वर्षे, व्यवसाय :
रा.काळुंद्रे, पो.ओएनजीसी कॉलनी,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
५) सौ.प्रेमा धनंजय घरत
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.घर नं.१०१, मारुती आळी, ग्राम.वहाळ,
पो.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
६) सौ.संगिता दशरथ म्हसकर
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.हाऊस नं.१०३, वाकडी,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
७) सौ.गिता मोरेश्वर उलवेकर
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.१०६, भगत पाडा, मु.पो.मोर्बे,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील अर्जदार क्र.१ ते ७ यांची आई कै.अनुबाई चांगा चिखलेकर ह्या दि.०४/०४/२०२१ रोजी काळुंद्रे येथे मयत झाल्या आहेत. कै.अनुबाई चांगा चिखलेकर ह्या हयात असताना त्यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वारसदार होत्या. ह्या जमीन मिळकती सरकारतर्फे सिडकोने नवी मुंबई योजनेसाठी भूसंपादीत केल्या आहेत त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**भूसंपादीत जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस क्रं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र एकर आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| ४३ (५१) | ५ | ३ | ००-०९-०० | 0.00 |
| | ५ | ४ अ | ००-००-००<br>पो.ख.००-११-९० | 0.00 |
| ४३ (५१ अ) | ३८ | १ | ००-०३-४० | 0.00 |
| ४३ (५१ ब) | ६७ | २ | ००-१६-०० | 0.00 |
| ४३/५१-३ | २४ | ५ | ००-०७-०० | 0.00 |
| | | एकूण | ००-५६-३० | |

**काळुंद्रे फाईल नं.९६**

| नोड | सेक्टर | प्लॉट नं. | एरिया |
|---|---|---|---|
| काळुंद्रे | - | ८३ | १०० मीटर |
| काळुंद्रे | - | ५३ | १५० मीटर |
| करंजाडे | ५ अ | ६८ | ४० मीटर |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.अनुबाई चांगा चिखलेकर यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.७ माहे डिसेंबर सन २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीने सर्व लोकांना कळविण्यात येत आहे की, खालील वर्णनाच्या जमीन मिळकती ह्या आमचे अशिल १) श्री.गणेश दुनकूर उर्फ दिनकर केणी, रा.मु.पेठाली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड व २) सौ. अपर्णा मंगळ पाटील, राहणार : कुत्तरपाडा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांच्या सहमालकी वहिवाटीच्या व ताबेकब्जातील मिळकती आहेत.

१) मौजे : तळोजे मजकूर, पिसार्वे, घोट व करवले बुद्रुक, सर्व तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकती आमचे अशिलांच्या वडिलोपार्जित मिळकती असून त्यामध्ये आमचे अशिलांचा अविभक्त असा कायदेशीर हक्क व हिस्सा आहे.

**जमीन मिळकतींचे वर्णन**
**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | गट क्र. | क्र.उपविभाग | क्षेत्र/हे.आर.प्रती | आकार/रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | ७ | २/अ/२ ब | १=०८=१० | १९=७५ |
| २ | ८ | २/अ | ०=०४=५० | ००=६६ |
| ३ | १२ | ५ | ०=१२=९० | ०१=५० |
| ४ | ६६ | ३ | ०=१५=९० | ०२=०० |
| ५ | ५५ | १ | ०=०७=१० | ०१=५० |
| ६ | ८ | २/क | ०=०४=३० | ००=५० |
| ७ | ४९ | ११ | ०=१७=०० | ००=४४ |
| ८ | ५ | ६ | ०=०१=०० | ००=३० |

**मौजे : पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | गट क्र. | क्र.उपविभाग | क्षेत्र/हे.आर.प्रती | आकार/रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | ६४ | ६ | ०=३७=०० | ०७=३२ |
| २ | ६४ | ५/९/ब | ०=३२=७० | ०४=०९ |
| ३ | ६४ | ३ | ०=१८=०० | ०३=१२ |
| ४ | ६४ | ४ | ०=१५=७० | ०१=५६ |

**मौजे : घोट, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | गट क्र. | क्र.उपविभाग | क्षेत्र/हे.आर.प्रती | आकार/रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | ५ | २ | ०=१३=७० | ०२=१९ |

**मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | गट क्र. | क्र.उपविभाग | क्षेत्र/हे.आर.प्रती | आकार/रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | ७८ | ३ | ०=४७=३० | ०८=३८ |
| २ | १०५ | ४/५/१ | ०=४३=८० | ०४=३७ |

वरील वर्णनाच्या जमीन मिळकती आमचे अशिलांना तुर्तास कोणासही विकणेच्या नाहीत, तसेच त्या विकणेबाबत किंवा त्यांचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करणेबाबत आमचे अशिलांनी कोणासही कोणत्याही प्रकारचे अखत्यारपत्रही दिलेले नाही. परंतु वरील जमीन मिळकतींचे वाटप करण्याचे सबबीखाली सौ.वंदना सोपान गावंड, रा.मु.तळोजे मजकूर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांनी त्यांचे सहकाऱ्यांचे मदतीने दि.०२/०८/२०२१ रोजी खोटेपणाने नोंदणीकृत अखत्यारपत्र तयार करून घेतले आहे व त्याचा वापर करून सदर व्यक्ती सौ.वंदना सोपान गावंड ह्या, वरील वर्णनाच्या जमीन मिळकती परस्पर विकण्यासंबंधी काही व्यक्तींशी बोलणीही करीत असून वरील जमीन मिळकतींचा विक्री वा तत्सम व्यवहार करणेचे प्रयत्नात आहेत. आमचे अशिलांनी सौ.वंदना सोपान गावंड, यांना वकीली नोटीस पाठवून सदरचे अखत्यारपत्र रद्द केल्याचे व रद्द करून घेण्याचे, तसेच त्याचा वापर न करण्याबाबत कळविलेले आहे.

आमचे अशिलांनी कोणालाही स्वखुषीने कोणत्याही प्रकारचे अखत्यारपत्र कोणत्याही कारणाकरिता दिलेले नाही. अशा परिस्थितीत वरील सौ.वंदना सोपान गावंड, यांनी खोटेपणाने व फसवणुकीने घेतलेले अखत्यारपत्र आमचे अशिल या जाहीर नोटीसनेही रद्द करीत आहेत.

तरी या जाहीर नोटीसीने सर्व लोकांस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांचे सामाईक मालकी वहिवाटीच्या वरील वर्णनाच्या जमीन मिळकतींबाबत कोणीही आमचे अशिल यांचे शिवाय कोणाशीही कोणत्याही प्रकारे व्यवहार करू नये. केल्यास सदरचा व्यवहार हा पूर्णपणे बेकायदेशीर असेल व तो आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक असणार नाही, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०७/१२/२०२१

सही/-
श्री.सुरेश ज. पाटील
ॲडव्होकेट
बी/३०२, निळकंठ दर्शन को.ऑप.हौ.सोसायटी,
मुंबई पुणे महामार्ग, ओरियन मॉल समोर,
पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६



मा.मुजावर साहेब

प्रो.जमा. ५०

अर्जदाराचे वकील
ॲड.समिर राम कुंभार

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७४२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१०/०१/२०२२

१) श्री.भगवान मधुकर कुंभार
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.हरिश्चंद्र मधुकर कुंभार
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.रवींद्र मधुकर कुंभार
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.१ ते ३ मु.मांजार्ली, ता.कल्याण, जि.ठाणे
४) सौ.दिपीका दिपक रसालकर
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कामण, ता.वसई, जि.पालघर
५) सौ.विद्या विनोद गोंधळी
वय : ३२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.गोऱ्हे, ता.वाडा, जि.पालघर अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.बारकी मधू मांजरेकर उर्फ आनंदीबाई मधुकर कुंभार या दि.१२/०५/२०१० रोजी मौजे : मांजार्ली, ता.कल्याण, जि.ठाणे येथे मृत्यू पावले आहेत. तसेच त्यांची आई कै.धोंडूबाई कृष्णा कुंभार या दि.१५/०७/२००७ रोजी मौजे : पालेखुर्द, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. येथे मृत्यू पावल्या असून त्यांचे नावे खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : देवीचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र/हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| ९ | - | ०-०७-०० | ०.१६ |
| १० | ५ | ०-४०-२० | ८.५७ |

कै.बारकी मधू मांजरेकर उर्फ आनंदीबाई मधुकर कुंभार तसेच त्यांची आई धोंडूबाई कृष्णा कुंभार यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०६ डिसेंबर २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मे.सोनावणे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील
ॲड.मेहबुब गै. पटेल
ॲड.मनोज म्हात्रे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१८५८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२४/०१/२०२२

१) श्री.संजय यशवंत कांडपिळे
वय : ६३ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.मातृपितृ छाया, पोदी नं.१, एस.पी.मोरे कॉलेजजवळ,
सेक्टर १५, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.अजय यशवंत कांडपिळे
वय : ६० वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.पर्ल होम्स बिल्डींग, प्लॉट नं.४१३, के मॉल जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ व २ यांचे वडील कै.यशवंत गंगाराम कांडपिळे हे दि.३०/०५/२०१७ रोजी मयत झाले असून कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांच्या नावाने मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत असून सदर मिळकत महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत करण्यात आली असून सदर मिळकतीचे ॲवार्ड हे कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे नांवे आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ. नं. | मौजे | युनिट केस नं. | स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल | पनवेल -३८३/ब | ३०५/२+३+३०६ ते १०+३११/३ +३१२/२ | १६<br>२२ | १२४४.४<br>१२२४.०<br>२४६८.४ | २.१६<br>२.४४ |

येणेप्रमाणे वर नमूद मिळकतीच्या अनुषंगाने कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०७/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## १६ डिसेंबर रोजी डाक अदालतीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अधीक्षक डाकघर रायगड विभाग, अलिबाग यांच्या कार्यालयाद्वारे दि.१६ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

रायगड विभागातील डाक सेवेसंबंधीत तक्रार/ समस्या ज्याचे निवारण आठवडा कालावधीत झालेले नाही, अशा टपाल स्पीडपोस्ट काउंटर सेवा, बघत बँक, मनी ड्रॉ संबंधित तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारीत सविस्तर माहिती जसे दिनांक, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा इ. असणे आवश्यक आहे. इच्छुक ग्राहकांनी आपली तक्रार २ प्रतीत डाकघर रायगड विभागाच्या अधीक्षकांकडे दि.१५ डिसेंबर २०२१ पर्यंत पोहोचेल अशा रितीने पाठवावी, असे आवाहन डाकघर अधीक्षक श्री.ए.जी.पाखरे यांनी केले आहे.

## अष्टपैलू क्रिकेटपटू रमाकांत पाटील यांचे निधन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण पुर्व विभागातील अष्टपैलु क्रिकेट पट्टू रमाकांत पाटील (४४) यांचे अल्पशा आजाराने दुर्दैवी दुःखद निधन झाले.त्याच्या पार्थिव देहावर सारडे गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

रमाकांत पाटील यांचा जन्म उरण तालुक्यातील सारडे गावातील भाऊ पाटील यांच्या कुटुंबात झाला होता.रमाकांत पाटील यांना क्रिकेटची आवड लहानपणापासूनच होती. सारडे येथील न्यु स्टार संघाचा आदर्श कर्णधार म्हणून काम पाहिले.एक उत्कृष्ट गोलंदाज,एक उत्कृष्ट फलंदाज म्हणून ग्रामिण भागातील क्रिकेट चे मैदान गाजविले होते. एक आदर्श खेळाडू म्हणून उरण पुर्व विभागातील जनता, क्रिकेट प्रेमी रमाकांत पाटील यांच्या कडे पाहत होती. रमाकांत पाटील या अष्टपैलू क्रिकेटपटूच निधन हे अल्पशा आजाराने वयाच्या ४४ व्या वर्षी झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.रमाकांत पाटील यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,आई वडील भाऊ बहीण असा परिवार आहे.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती देण्याबाबत शासनाची उदासीनता

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शासनाच्या २१ डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयाने अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिसंख्य कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक व सेवानिवृत्तीनंतरचे लाभ कसे द्यायचे, याचा अभ्यास करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मंत्री ना. छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५जून २०२० रोजी अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली होती.

या समितीला शासनाने वेळोवेळी मुदत वाढही दिली. दरम्यान छगन भुजबळ यांनी समितीचा अहवाल शासनास सादर केल्याचे पत्रकार परिषद घेवून जाहीर केले. मात्र सामान्य प्रशासन विभागाने अद्यापही अहवाल प्राप्त न झाल्याचे आफ्रोह संघटनेला लेखी कळविल्यामुळे गोंधळच उडाला आहे. या मागे नेमके काय गौडबंगाल आहे?,असा प्रश्न



अधिसंख्य पदावरील कर्मचा-यांकडून विचारला जात आहे.

यामागील सत्य जाणून घेण्यासाठी ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्यूमन(ऑफ्रोह) संघटनेने सचिव स्तरावर संघटनेशी बैठक लावण्याची विनंती राज्यमंत्री मा. नामदार दत्तात्रय भरणे व मा. नामदार सतेज पाटील यांनी केली. दि.२६ ऑक्टोबर २१ ला अधिकृतपणे ऑफ्रोह संघटनेसोबत अधिसंख्य कर्मचाऱ्याच्या प्रश्नावर नामदार भरणे यांच्या दालनात बैठक घेण्यात आली. या बैठकीत सामान्य प्रशासन विभागाचे सचिव , विधी व न्याय विभागाचे सचिव उपस्थित होते. या बैठकीत सचिवांनी मा. भुजबळ समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाल्याचे सांगितले. लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत हा अहवाल ठेवून शासन निर्णय घेण्यात येईल, ही माहिती देण्यात आली. परंतु १ महिना आटोपल्यानंतर सुद्धा मंत्रिमंडळ बैठकीत अहवाल ठेवण्यात आला नाही. त्यामुळे दि.२६ ऑक्टोबर च्या बैठकीचे इतिवृत्त संघटनेने मागितले असता ना. छगन भुजबळ समितीचा अहवाल शासनास अद्याप प्राप्त झाला नसल्याची धक्कादायक माहिती मिळाली असल्याचे श्री.सहारकर यानी सांगितले.

२ ऑक्टोबर पासून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे पेंशन व इतर लाभ मिळावे या मागणीसाठी ऑफ्रोह संघटनेच्या वतीने आझाद मैदान मुंबई ला उपोषण सुरू आहे. ६५ दिवस झाले परंतु एकही नेता उपोषण स्थळी समस्या जाणून घ्यायला आला नाही. आता मात्र अधिसंख्य सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सहनशिलता संपली आहे.

यानंतर आंदोलन तीव्र करण्या चे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी ठरविले आहे.हे विशेष. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मंत्रालयात चौकशी केली असता भुजबळ समितीचा अहवालावर समितीमधील सदस्य असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री स्वाक्षरी करण्यास तयार नसल्याचे कळले. समितीचे अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री मा. नामदार छगन भुजबळ असतांना त्यांच्याच पक्षाच्या दुसऱ्या सदस्य मंत्र्यांनी स्वाक्षरी करू नये, हे फार मोठे कोडे आहे.

## संविधान व आंबेडकरी विचार जतन करण्यास भारतीय जनता पार्टी सदैव कटिबद्ध : आ.चंद्रकांत पाटील

**दै.रायगड नगरी । खोपोली**

महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व दिपप्रज्वलन केल्यानंतर भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रकांत पाटील म्हणाले की, संविधान व आंबेडकरी विचार जतन करण्यास भारतीय जनता पार्टी सदैव कटिबद्ध आहे.

यावेळी भारतीय जनता पार्टी अनु. जा. मोर्चाचे शहराध्यक्ष भिमराव साठे, सचिव महा. राज्य प्रभारी पुणे अतुल साळवे, सचिव महा. राज्य राजू जाधव, सरचिटणीस महेश सकट, सरचिटणीस राजेंद्र खैरे, उपाध्यक्ष किशोर वाघमारे, बापू कांबळे, अनिल पाटोळे, हिराजी बुवा, विकास सोनावणे, शशी जाधव, सचिव सोशल मीडिया प्रमुख संदिप ओव्हाळ आदी उपस्थित होते.



## तळा नगरपंचायत निवडणुकीसाठी १७ जागेसाठी ७७ अर्ज दाखल

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायत निवडणूक हि अत्यंत चुरशीची होणार असुन प्रत्येक राजकीय पक्ष स्वतंत्र लढवत असुन नगरपंचायतीच्या एकूण १७ जागेसाठी एकूण ७७ नामनिर्देशन अर्ज आज दाखल करण्यात आले असल्याचे निवडणूक निर्णायक अधिकारी विठ्ठल इनामदार यांनी सांगितले. यामध्ये शिवसेनेकडून १५ जागेवर नामनिर्देशन अर्ज भरण्यात आले आहेत. तर दोन ठिकाणी शिवसेना पुरस्कृत अपक्ष उमेदवार निवडणुकीत आपले नशीब आजमावणार आहेत तरराष्ट्रवादी काँग्रेस कडून१७ पैकी १३ठिकाणी आपल्या उमेदवारांचे अर्ज दाखल केले आहेत तर भारतीय जनता पार्टी कडून १७ पैकी ८ उमेदवारांचे अर्ज आज दाखल करण्यात आले तर काही ठिकाणी अपक्ष भाजपा पुरस्कृत उमेदवारांचे अर्ज भरण्यात आलेले आहेत. या निवडणुकीत शेकाप त्याचप्रमाणे वंचित बहुजन आघाडी आणि मनसे पक्ष देखील आपले नशीब आजमावणार आहेत शेकाप आणि मनसे कडून दोन प्रभागात तर वंचित एका ठिकाणी आपले नशीब आजमवणार आहेत. त्याचप्रमाणे अपक्ष देखील आपले नशीब आजमावणार आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस असल्याने उमेदवारांची अर्ज दाखल करण्यासाठी कागदपत्रांची जमवाजमव करण्यासाठी चांगलीच धावपळ सुरू होती. शिवसेना पक्षाने काल आपल्या पक्षाच्या उमेदवारांचे अर्ज दाखल केले. यावेळी दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख अनिल नवगणे, ॲड. राजीव साबळे तालुका प्रमुख प्रद्युम्न ढसाळ, शहर प्रमुख राकेश वडके व शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी अर्ज दाखल करण्या पूर्वी शहरातून रॅली काढत शक्ती प्रदर्शन करत आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी आ.अनिकेत तटकरे, तालुका अध्यक्ष नाना भौड, शहर अध्यक्ष महेंद्र कजबजे, चंद्रकांत रोडे आदी मान्यवर उपस्थित होते. ओबीसी रद्द झाल्याने संभ्रमाचे वातावरण उमेदवारांमध्ये पहायला मिळत आहे..

## हुतात्मा नाग्या महादू कातकरी भवन सामाजिक व शैक्षणिक कार्य व चळवळीचे केंद्रबिंदू ठरेल : धैर्यशीलदादा पाटील

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**



सुधागड तालुका हा आदिवासी बहुल तालुका आहे. येथील डोंगर दर्याखोऱ्यात, जंगल रानावनात माळरान पठारावर मोठ्या प्रमाणावर आदिवासी कातकरी समाज वास्तव्यास आहे. परळी विभागातील आदिवासी बांधवांसाठी सामाजिक सभागृह असावे अशी सर्वांचीच इच्छा होती. अखेर ही स्वप्नपूर्ती झाली असून परळीत सर्वांगसुंदर असे हुतात्मा नागु कातकरी समाज भवन साकारले आहे. भविष्यात हे समाजभवन सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्याचे व चळवळीचे केंद्रबिंदू ठरेल असे प्रतिपादन माजी आमदार, सक्षम युवा नेतृत्व धैर्यशीलदादा पाटील यांनी केले.

सुधागड तालुका आदिवासी समाजातर्फे परळी येथे हुतात्मा नाग्या महादू कातकरी भवनाचा भव्य उदघाटन सोहळा दि(०७) डिसेंबर २०२१ मंगळवारी १२.३० वाजता अत्यंत उत्साही व खेळीमेळीच्या वाता-वरणात पार पडला. पेण सुधागड रोहा मतदार संघाचे माजी आमदार धैर्यशील दादा पाटील, परळी सरपंच संदेशभाई कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीत या भवनाचे उदघाटन करण्यात आले.

तत्कालीन आमदार धैर्यशीलदादा पाटील व शेकाप नेते सुरेशशेठ खैरे यांच्या प्रयत्नाने डोंगरी विकास कार्यक्रम ०४ अंतर्गत आदिवासी सामाजिक सभागृहासाठी तत्कालीन आमदार धैर्यशील पाटील यांच्या प्रयत्नाने ४ लाख ९५ हजार १५२ इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला. तसेच परळी ग्रामपंचायतिचे सरपंच संदेशभाई कुंभार व सर्व सहकारी यांनी भवनासाठी चार गुंठे जागा उपलब्ध करून देण्यात आली. त्याबद्दल सर्वांचे आभार मानण्यात आले. यावेळी माजी आमदार धैर्यशीलदादा पाटील यांनी नव्याने साकारलेल्या भवनास शुभेच्छा दिल्या. आदिवासी बांधव हे आपले प्रश्न घेऊन न्यायव्यवस्थेसाठी आपल्या हक्काच्या समाजमंदिरात बसतील, आपल्या संकल्पित वाचनालयासाठी सर्वोतोपरी प्रयत्न व सहकार्य करू असे आश्वाशीत केले.

यावेळी ॲड: प्रवीण कुंभार, सुनिल गायकवाड, दिलीप जाधव, पत्रकार धम्मशील सावंत यांनी आपले विचार मांडले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद गोळे यांनी केले.

## जे.एम.म्हात्रे चॅरीटेबल संस्थेच्यावतीने दिव्यांग रमाकांत कुंभार यांना व्हीलचेअर सुपूर्द

### मा.आदर्श नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांच्या हस्ते व्हीलचेअर वितरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जे.एम.म्हात्रे चॅरीटेबल संस्थेच्या माध्यमातून आरोग्यसेवा आपल्या दारी हा उपक्रम राबवित असताना आरोग्य सेविकांकडून दिव्यांग बांधव रमाकांत कुंभार यांना एका व्हीलचेअरची आवश्यकता असल्याची माहिती मिळताच संस्थेचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी तत्काळ ती उपलब्ध करून दिली. यावेळी मा.आदर्श नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांच्याहस्ते ही व्हीलचेअर रमाकांत कुंभार यांना देण्यात आली.



शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, एक आदर्श नेतृत्व, माजी आदर्श नगराध्यक्ष तथा उद्योजक जे.एम. म्हात्रे यांच्या नावाने पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी जे.एम.म्हात्रे चॅरीटेबल संस्था उभी केली. आजपर्यंत अनेक गरजूंना या संस्थेच्या माध्यमातून मदत करण्यात आली. कोरोना कालखंडामध्ये अनेक भुकेलेल्यांना अन्नाचा सुखाचा घास भरविण्याचे पुण्याचे कार्य या संस्थेच्या माध्यमातून करण्यात आले. गोरगरिबांची दिवाळी गोड करण्यासाठी न नफा न तोटा या तत्वावर त्यांनी हजारो टन फराळाचे साहित्य त्यांच्यापर्यंत पोहोच केले. सामाजिक क्षेत्रासह, क्रीडा, सांस्कृतिक आणि आरोग्यसेवेत त्यांनी आपले योगदान दिले आहे.

नुकतेच आरोग्यसेवा आपल्या दारी हा उपक्रम ते राबवित असताना आरोग्य सेविकांकडून दिव्यांग बांधव रमाकांत कुंभार यांना एका व्हीलचेअरची आवश्यकता असल्याची माहिती देण्यात आली. ही माहिती मिळताच प्रितम म्हात्रे यांनी क्षणाचाही विलंब न लावता तत्काळ व्हीलचेअर उपलब्ध करून दिली. यावेळी मा.आदर्श नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांच्याहस्ते सदरची व्हीलचेअर दिव्यांग बांधव रमाकांत कुंभार यांना सुपूर्द करण्यात आली. यावेळी रमाकांत कुंभार यांनी जे.एम.म्हात्रे चॅरीटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितम म्हात्रे यांचे आभार मानले.

## आपले कर्तव्य बजाविताना प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे : अजयकुमार लांडगे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजयकुमार लांडगे यांना बढती मिळून त्यांची पोलिस उप अधिक्षक नक्षलविरोधी अभियान नागपूर येथे बदली झाल्याने पनवेल शहर पोलिस ठाण्याच्या वतीने त्यांना अधिकारी व कर्मचारी वर्गाने निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, आपले कर्तव्य बजाविताना प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे आहे.

यावेळी पोलिस उप अधिक्षक अजयकुमार लांडगे यांच्या निरोप समारंभासाठी पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वपोनि विजय कादबाने, पोलिस निरीक्षक (गुन्हे) संजय जोशी यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी त्यांना वपोनि विजय कादबाने यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या छोटेखानी कार्यक्रमात अजयकुमार लांडगे यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाचा उल्लेख उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून केला. त्याचप्रमाणे त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी पोलिस उप अधिक्षक अजयकुमार लांडगे यांनीसुद्धा आत्तापर्यंत केलेल्या पोलिस खात्यातील कामामध्ये आलेले वेगवेगळे अनुभव उपस्थितांसमोर मांडले. तसेच आपले कर्तव्य बजाविताना प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जीवनात आव्हान स्विकारणे महत्वाचे आहे. कामात चुकारपणा न करता ते आपले कर्तव्य आहे हे समजून करावे असेही त्यांनी सांगितले.

## शक्तीप्रदर्शनासह उमेदवारी अर्ज दाखल मात्र ओबीसी आरक्षणावरुन संभ्रम

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव नगरपंचायत काल आणि आज अंतिम दिवशी निवडणुक उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांची व अधिकृत उमेदवारी मिळालेल्यांची माणगांवच्या प्रशासकिय भवनाकडे भाऊगर्दी झाली. आघाडी उमेदवारांचे शक्तीप्रदर्शन रॅलीसह काहींनी तोंडाला कोरोना प्रतिबंधक मास्क लावुन पण सुरक्षित अंतर न राखताच, अर्ज दाखल करण्यासाठी उत्सा-हात हजेरी लावली. आता रण धुमाळीची चिन्ह स्पष्ट दिसत असतानाचा ओबिसी आरक्षणाच्या मुद्द्या वरुन मुंबई सुप्रीम कोर्टानं, महाराष्ट्र सरकारनं स्थानिक स्वराज संस्थांमधील ओबीसी आरक्षणासाठी जारी केलेल्या अध्यादेशाला स्थगिती दिली असल्याचे समजते.



या निर्णयानंतर राजकीय आरोप प्रत्यारोप सुरु झालेत. दुसरीकडे जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि १०५ नगरपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. या निवडणुकांवर देखील या निर्णयाचा परिणाम होणार असल्याची चर्चा सुरु झाली आहे. पुन्हा एकदा निवडणुक पुढे जाते कि काय? अशी मतदारांसह उमेदवारांचे मनात संभ्रमाची पाल चुक-चुकत आहे. राज्य निवडणूक आयुक्त यूपीएस मदान यांनी ओबीसी प्रभागातील निवडणुकीला स्थगिती देण्यात आल्याची माहिती दिली असल्याचे संदेश व्हाटस् ॲप वर व्हायरल होत आहेत.

जिल्हा परिषद, त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्या आणि ३२ जिल्ह्यातील १०५ नगरपंचायती मधील निवडणुकां साठी ज्या जागांवर ओबीसी प्रवर्ग राखीव करण्यात आले होते, त्या जागांवरील निवडणूक स्थगित करण्यात आली असे बोलले जाते. ओबीसी प्रभाग वगळता इतर जागांवरील निवडणुकीसाठी २१ डिसेंबरला मतदान होईल असे बोलले जात आहे. या बाबत लोकप्रतिनीधी व संबंधित तालुक्यातील निवडणुक अधिकारी यांचे जवळ माहिती घेतली असता त्यांना देखिल याबाबत अजुनही स्पष्टता नसल्याचे बोलत आहेत.



अशातच मंगळवार दि. ७ डिसेंबर रोजी शिवसेना महाविकास आघाडीची भव्य रॅली माणगांव बालाजी मंदिर येथुन निघाली या रॅलीत नगरपंचायतीचे सर्व उमेदवार नेते मंडळी सोबत ञ शिवसेनेचे नेते ॲड.राजीव साबळे, दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख अनिल नवगणे माजी जि.प. सदस्य ज्ञानदेव पवार, ॲड. महेंद्रजी मानकर, शिवसेना ता. प्रमुख गजानन अधिकारी, मारुतीशेठ बोंबले,लालताशेठ कुशवाह, शहर प्रमुख अजित तार्लेकर, नितिन दसवते, समाधान उतेकर, राजीव मेहता तसेच सर्व पदाधिकारी अनेक शिवसैनिक उपस्थित होते. विशेष म्हणजे शिवसेना महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांनी लोकनेते कै. अशोकदादा साबळे यांचे स्मारका जवळ जाऊन नतमस्तक होत उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. आता निवडणुकीची धामधुम सुरु झाली आहे.